# के के वाघ तंत्रनिकेतन, नाशिक

कार्यालय :- हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम,पंचवटी,नाशिक-०३

दि २७/०२/२०२१

के. के. वाघ तंत्रनिकेतन, नाशिक च्या वतीने आज दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त थोर साहित्यिक , कवी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरवदिन म्हणून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला के. के. वाघ तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा. पी टी कडवे यांनी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी तंत्रनिकेतनचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी डॉ . प्रा . पी. एस. भंडारी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते .




डॉ . प्रा . पी. एस. भंडारी व्याख्यानात म्हणाले कि मराठी भाषा वाचवण्यासाठी या महाराष्ट्रात संतांपासुन तर साहित्यकांपर्यन्त अनेकांनी प्रयत्न केले असून मराठी भाषेची संस्कृती जतन केली पाहिजे. मराठी भाषेला खरा मान सन्मान मराठी साहित्यिक वि. वा. शिरवाडकर, ग दि माडगुळकर,प्र के अत्रे , वि स खांडेकर ,भा रा तांबे अशा अनेक दिग्गज व्यक्तींनी दिला. मराठी भाषेचा प्रत्येकाने अभिमान बाळगला पाहिजे. मराठीचा अभिमान बाळगताना आपण आपल्या मातृभाषेतच बोलले पाहिजे आणि समोरच्यालाही मराठीतूनच बोलण्याचा आग्रह धरावा कारण एखाद्या व्यक्तीने हिंदीतून बोलण्यास सुरुवात केली तर नकळत आपणही त्याच्या भाषेतून बोलतो हा मराठी भाषेचा अपमान आहे . डॉ . प्रा . पी. एस. भंडारी यांनी नटसम्राट या नाटकाविषयी बोलताना वि. वा. शिरवाडकर किती प्रतिभावान होते याचा दाखला दिला. मराठी साहित्यात दर्जेदार साहित्यकृती निर्माण करून वि. वा. शिरवाडकर यांनी साहित्य क्षेत्रात मानाचा तुरा रोवला. त्यांच्या असाधारण लेखनास व त्यांनी लिहिलेल्या ययाती कादंबरीस ज्ञानपीठ पुरस्कारने सन्मानित करण्यात आले. आजच्या युगात नवोदित साहित्यिकांनी वि. वा. शिरवाडकर यांचा आदर्श घ्यावा.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. सोमनाथ पगार यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमास प्राचार्य प्रा. पी टी कडवे, श्री. आर व्ही गायकवाड ,प्रा. व्ही एस कलमांनी ,प्रा जी बी कातकाडे, प्रा एच एम गायकवाड,प्रा जे एम पाटील, प्रा. ए डी वाटपाडे तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कमर्चारी उपस्थित होते.